गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक २९ वा ● शनिवार १५ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 29 | Date : 15/06/2024 blow Saturday Page 4 Price 4

## राज्याचा अर्थसंकल्प २८ जूनला

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरुवार २७ जून ते शुक्रवार १२ जुलै या कालावधीत होणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या उभय सभागृहात मांडण्यात येणार आहे. विधानभवनात शुक्रवारी झालेल्या विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीला विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास



दानवे, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार (दूरचित्र संवादाच्या माध्यमातून) यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी उपस्थित होते.पावसाळी अधिवेशनात एकूण तेरा दिवस कामकाज चालणार आहे. शनिवार २९ जूनला सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, असेही बैठकीत ठरविण्यात आले. विद्यमान विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन असेल.

## अरुंधती रॉय यांच्यावर खटला चालवण्यास मंजुरी

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लेखिका अरुंधती रॉय आणि काश्मीरमधील माजी प्राध्यापक यांच्यावर २०१० मध्ये एका कार्यक्रमात कथितपणे प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल कठोर बेकायदा कृती (प्रतिबंध) कायद्यांतर्गत खटला चालवण्यास दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी मंजुरी दिली आहे. राज निवासच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी ही माहिती दिली. रॉय आणि काश्मीर सेंट्रल युनिव्हर्सिटीचे माजी प्राध्यापक शेख शौकत हुसेन यांच्याविरुद्ध



नवी दिल्लीच्या महानगर न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशानंतर एफआयआर दाखल करण्यात आला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. रॉय आणि । **पान २ वर**

## जिल्ह्यातील एक लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर विभाग कंपनीकडून ११३ कोटींचे अग्रीम जमा

*** ओरिएंटल विमा कंपनी सोबत पिक विमा मंजूर करण्यासाठी आठ बैठका कृषी आयुक्त कृषी सचिव कृषी मंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा * पिक विमा कंपनीचे सोयाबीन मका व बाजरी या पिकासाठी २५% अग्रीम म्हणून ११३.८२ कोटी वाटप**

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्रधानमंत्री पिक विमा योजना २०२३ हंगामामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सहा लाख ७५ हजार ३११ शेतकऱ्यांची पाच लाख तेवीस हजार १७७ हेक्टर क्षेत्रासाठी पिक विमा कंपनीकडे विमा भरलेली होता खरीप हंगाम २०२३ अंतर्गत प्रतिकूल परिस्थितीच्या अनुषंगाने अनुसूचित सर्व पिकांसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आधी सूचना निर्मित करून पंचवीस टक्के अग्रीम नुकसान भरपाई



देण्याबाबत पीक विमा कंपनी आदेशित केले होते त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी केलेल्या सातच्या पूर्ण पाठपुराव्याला यश येऊन विमा कंपनीने बाजारी मका व सोयाबीन पिकांसाठी एक लाख ९० हजार ४५८ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ११३ कोटी ८२ लाख रुपयाचा निधी थेट जमा केला आहे अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रेय गावसने यांनी दिली

ओरिएंटल विमा कंपनीकडून मका सोयाबीन व बाजरी पिकांसाठी पंचवीस टक्के अग्रीम म्हणून वाटप केलेली निधी या शेतकऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणे अक्कलकोट २१ हजार ८८५ शेतकऱ्यांना १२ कोटी ४९ लाख ८५ हजार २. बार्शी ८८ हजार ४०२ शेतकऱ्यांना ५९ कोटी ३२ लाख ३२००० ३. करमाळा ५९ ५९ शेतकऱ्यांना ८६ लाख ८४ हजार ४. माढा २६ ७१ शेतकऱ्यांना २७ लाख ५८ हजार ५. माळशिरस आठ हजार ९१ शेतकऱ्यांना एक कोटी ६२ लाख २६ हजार ६. मंगळवेढा दहा हजार १०६ शेतकऱ्यांना २६ कोटी ९ लाख ११ हजार ७. मोहोळ अकरा हजार ७४१ शेतकऱ्यांना सात कोटी आठ लाख ३१ हजार ८. पंढरपूर ८२१ शेतकऱ्यांना आठ लाख ८० हजार ९. सांगोला १४,२४८ शेतकऱ्यांना चार कोटी ३७ लाख २१ हजार १०. सोलापूर उत्तर पंधरा हजार ६२७ शेतकऱ्यांना १३ कोटी ८६ लाख ३८ हजार व सोलापूर दक्षिण दहाच्या ९७९ शेतकऱ्यांना अकरा कोटी तेरा लाख ८२ हजार असे एकूण एक लाख ९० हजार ४५८ शेतकऱ्यांना ११३ कोटी ३२ लाख ३८ हजार निधी विमा कंपन्याकडून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वितरित करण्यात आला अशी माहिती श्री गवासने यांनी दिली

नैसर्गिक आपत्यातील शेतकऱ्यांना निधी वाटप करण्यातही सुरू

तसेच जिल्ह्यामध्ये अनेक स्थानिक नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने ६५ हजार ९८१ शेतकऱ्यांना पूर व सूचना दिल्या होत्या त्यापैकी ५९ हजार ११० । **पान २ वर**

## मोदींची सुनक, माक्राँ, झेलेन्स्कींशी चर्चा; जी ७ परिषदेत दिवस भेटीगाठींचा

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दक्षिण इटलीतील अपुलिया येथे 'जी-७'परिषदेसाठी दाखल झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वेळी ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याशी चर्चा केली. तसेच युक्रे नचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांची भेट घेऊन पंतप्रधान मोदी यांनी युक्रेन संघर्षावर तोडगा कोढण्याची ग्वाही दिली. पंतप्रधान शिखर परिषदेत पोहोचल्यावर त्यांनी पोप फ्रोन्सिस यांचीही भेट घेतली. मोदी यांनी फ्रोन्सचे अध्यक्ष इमॅन्युएल माक्रौं यांचीशीही संवाद साधला.



जी ७ समूहाच्या शिखर बैठकीसाठी इटलीतील अपुलिया येथे गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी अनेक महत्त्वाच्या राष्ट्रप्रमुखांशी विविध विषयांवर चर्चा केली. या परिषदेस प्रथमच हजेरी लावणारे ख्रिस्ती धर्मियांचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांचीही मोदींनी भेट घेतली.

अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, कॅनडा, इटली आणि जपान या जी ७ समूहाच्या राष्ट्रांबरोबरच भारतासह आफ्रिका आणि आशियातील काही देशांशी संवाद साधण्याच्या 'आऊटरीच' धोरणाअंतर्गत या परिषदेचे निमंत्रण मिळाले आहे. युक्रेन युद्ध, पश्रिचम आशियातील संघर्ष, वातावरण आणि ऊर्जा, स्थलांतरण, अन्न सुरक्षा, कृत्रिम प्रज्ञेचा वापर असे अनेक मुद्दे कार्यक्रमपत्रिकेवर आहेत. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी परिषदेच्या यजमान आहेत.मोदी यांनी शिखर परिषदेत पोहोचल्यावर पोप फ्रान्सिस यांची भेट घेतली. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी भारताने घेतलेल्या महत्त्वाकांक्षी पुढाकारांची आणि करोना लशींच्या १०० कोटी मात्रा देण्याच्या भारताच्या यशाबाबत मोदींनी पोप यांना माहिती दिली.

मोदी यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली. युक्रेन युद्धाच्या सद्य:स्थितीवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. संवाद आणि सहमतीतूनच युक्रेन युद्धावर सर्वमान्य तोडगा निघू शकतो, असे मोदी यांनी सांगितले. तोडगा निघण्यासाठी लागेल ती मदत करण्याची भारताची तयारी असल्याचेही मोदी यांनी म्हणाले. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याशी नरेंद्र मोदी यांनी । **पान २ वर**

## अजित पवारांना भाजपाकडून बाजूला केलं जातं आहे, जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अजित पवारांना बाजूला करण्याचा प्रयत्न भाजपाकडून होतो आहे. चारही बाजूंनी त्यांच्यावर हल्ले केले जात आहेत असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केलं आहे. अजित पवार यांचे कार्यकर्ते जितेंद्र आव्हाड हे नाव घेऊन बोलत असतात. हिंमत असेल तर भाजपाला बोला. उठलंसुठलं की माझ्यावर तोंडसुख घेऊ नका.समाज कल्याण विभागाने मागासवर्गीय समाजासाठी जाचक अटी घातल्या आहेत. त्यामुळे कुणी विद्यार्थी परदेशात शिकायला जाणार नाही. ७५ टक्केंची अट घालण्यात आली आहे तसंच उत्पन्नाची अटही ८ लाख रुपये केली आहे. ज्यावेळी मनुस्मृती डोक्यात जाते तेव्हा असे विचार येतात. मागासवर्गीय समाजाने शिकू नयेत म्हणून हे प्रयत्न चालले आहेत. ओबीसी भटक्या जमाती यांच्या स्कॉलरशिपची अडचण यामुळे निर्माण झाली आहे असाही आरोप जितेंद्र आव्हाडांनी केला. शरद पवारांवर कुणीही टीका केली तर तो । **पान २ वर**



## पालखी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधांचे नियोजन करा: उपमुख्यमंत्री अजित पवार

### उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पालखी सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक संपन्न

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आषाढी पालखी सोहळ्यादरम्यान पंढरपूर, पालखी मार्ग, पालखी तळ आदी ठिकाणी पाणी, वीज, आरोग्य आणि स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. सोहळ्यासाठी शासनातर्फे आवश्यक निधी देण्यात येईल अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. विधान भवन पुणे येथे झालेल्या श्री क्षेत्र देहू व श्री क्षेत्र आळंदी पालखी सोहळा-२०२४ पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार दिलीप मोहिते पाटील, संजय जगताप, दत्तात्रय भरणे, समाधान आवताडे, बबनदादा शिंदे,संजय शिंदे, सुनील कांबळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल, पुणे आणि सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.



श्री.पवार म्हणाले, पालखी सोहळ्यासाठी फिरते शौचालय आणि टँकरची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी. शौचालयाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे. राज्य शासनाकडून पालखी सोहळ्यासाठी आवश्यक कामासाठी उपलब्ध करून देण्यात येणारा निधी प्राप्त होईपर्यंत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून खर्च करावा.

इंद्रायणी नदी स्वच्छतेचे काम तातडीने करण्यात यावे. पालखी सोहळा झाल्यानंतर पंढरपूर शहरात स्वच्छतेसाठी आवश्यक नियोजन करण्यात यावे. मानाच्या पालख्यांसह इतर पालख्यांसाठी रात्रीच्या वेळी विद्युत व्यवस्था करण्यात यावी. पालखी मार्गाला लागून असलेल्या जागा सोहळ्याच्यादृष्टीने कायमस्वरूपी ताब्यात घेऊन त्याचा पालखी सोहळा वगळता इतर वेळी अन्य उपयोग करण्याबाबत प्रस्ताव तयार करावा. अशा जागांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. पालखी मार्गावरील कायमस्वरुपी सुविधेच्यादृष्टेने विभागीय आयुक्तांकडे बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

पालखी सोहळ्याच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनांची अधिकाऱ्यांनी नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. पालखी सोहळा चांगल्यारितीने संपन्न व्हावा यासाठी शासन-प्रशासनातर्फे आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल. शासनाचे सर्व विभाग सकारात्मक राहून सोहळा यशस्वी करण्यासाठी काम करतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अन्य जिल्ह्यातून येणाऱ्या पालखी सोहळ्यासाठी सुरक्षा आणि अन्य व्यवस्था देण्याबाबत राज्य स्तरावरून सूचना देण्यात येतील. वारी दरम्यान दुर्घटना घडल्यास शासनातर्फे आर्थिक सहकार्य करण्यात येईल, असेही श्री.पवार यांनी सांगितले.विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. यावर्षी फिरते शौचालय आणि स्वच्छतेसाठी । **पान २ वर**

### सोलापूर जिल्ह्यातील नियोजन

जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्यातील नियोजनाची माहिती दिली. सोलापूर जिल्ह्यात करण्यात आलेल्या आरोग्य सुविधा, नियुक्त करण्यात आलेले आरोग्यदूत, घटना प्रतिसाद प्रणाली, आपत्ती व्यवस्थापन व मदत केंद्र याबाबत नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मागील वर्षी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार दर्शन बारीमधील प्रत्येक वारकऱ्याला एक लिटर पाण्याची बाटली व लिंबू पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच पंढरपूर शहर व परिसरात स्वच्छता, पिण्याचे स्वच्छ पाणी, शौचालय, वारकऱ्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेसह स्वच्छ वारी, निर्मल वारीच्यादृष्टीने सर्व नियोजन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

## संपादकीय

### विरोधकांना अपयश आले...

सगळेच एक्झिट पोल, ओपिनियन पोल एकसाथ पालथे पाडत यावेळच्या लोकसभा निवडणुकीने भारतीय मतदारांचा विवेक प्रचंड जागृत असल्याचे दाखवून दिले. यावेळची निवडणूक जनतेनेच हाती घेतली होती. राजकीय पक्षांना शहाणपणाचा धडा देण्याचे यावेळी जनतेनेच ठरविले होते. धर्म, आस्था, जात, द्वेष, अहंकार या सगळ्यांना इथल्या राजकारणात स्थान नाही, हेच यावेळी लोकांनी दाखवून दिले. निवडणुकीपूर्वी भाजपने दिलेल्या चारसो पारच्या नाऱ्यातून भाजपचा अहंकार झळकत होता.

हा अहंकार मतदारांना गृहीत धरण्याचा होता. देशाच्या याच मतदारांनी इंदिरा गांधींसारख्या नेत्यांनाही पराभूत केले होते, याचे विस्मरण भाजपच्या अहंकारी नेत्यांना झाले होते. जगातला सगळ्यात मोठा पक्ष म्हणून मिरविणाऱ्या भाजपने भारतात विरोधक शिल्लकच ठेवायचे नाही, या गुर्मीत राजकारण सुरू केले होते. भाजपच्या या अहंकाराला मतदारांनी झणझणीत चपराक लगावली आहे. विरोधक बेरोजगारी, महागाई, संविधानाचे रक्षण अशा मुद्द्यांवर प्रचार करीत असताना भाजपने त्याकडे आपल्याच अहंकारात दुर्लक्ष करीत राम मंदिर, मंगळसूत्र, मुस्लीम याच मुद्द्यावर भर दिला. सामान्य लोकांचे प्रश्न वेगळे होते, त्याला त्याची भूक महत्त्वाची वाटत होती, त्याला त्याचे अधिकार महत्त्वाचे वाटत होते, त्याला त्याची सुरक्षा महत्त्वाची वाटत होती, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला मिळणारे दाम महत्त्वाचे वाटत होते. यावरच भाजपचे नेते बोलत नव्हते. हा अहंकारच भाजपला नडला. जागतिक नेते बनण्याच्या धुंदीत आपल्याच देशाच्या भूमीवर काय होत आहे, इथल्या सामान्य लोकांची काय गरज आहे, इथल्या शेतकऱ्यांच्या काय मागण्या आहेत, इथल्या तरुण लोकांना कशाची गरज आहे या सगळ्याचा विसर पंतप्रधानांना पडला होता. विरोधकांना राजकीय लढाईत पराभूत करण्याऐवजी त्यांना राजकीय आयुष्यातूनच उठविण्याचे अतिशय घृणास्पद राजकारण करण्यात आले. त्याचा मोठा फटका महाराष्ट्रात बसला. पश्चिम बंगालमध्ये ध्रुवीकरणाचे राजकारण तापविण्यात आले, त्याला तिथल्या मतदारांनी साफ नाकारले.

केंद्रीय यंत्रणांचा वाटेल तसा दुरुपयोग करण्यात आला, त्याचेही पडसाद उमटले. काँग्रेस आणि सहकारी पक्षांनी अतिशय मेहनतीने ही निवडणूक लढविली, मतविभाजनाचा भाजपला फायदा होऊ नये याची काळजी मतदारांनी घेतली. अर्थात उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यांनी भरपूर साथ दिल्यानंतरही मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगढ या भाजपच्या बालेकिल्ल्यांना सुरुंग लावण्यात विरोधकांना अपयश आले.

# पहिलीचा वर्ग म्हणजे दुसरा स्वर्ग!

ऋग्वेदा नुसार स्वर्ग हे देवांचे निवासस्थान आहे. अथर्व वेदा नुसार स्वर्गात खूप सुख आहे. उपनिषदा नुसार स्वर्गात कसलेही भय नाही. स्वर्ग हा पृथ्वीच्या वर म्हणजे आकाशात वसलेला आहे असे मानतात. परंतु स्वर्ग म्हणजे नक्की काय आहे? तो कुठे आहे? याबाबत कोणी आपणाला खात्रीने माहिती देईल का? तर त्याचे उत्तर असेल नाही. कारण आतापर्यंत कोणी असा झाला नाही की तो स्वर्गात जाऊन परत आपल्यात आला आहे. परंतु मी आपणाला निरीक्षण शक्तीच्या आधारे, अध्यात्मिक दृष्टिकोनाच्या आधारे आणि मुलं म्हणजे देवाघरची फुलं! या उक्तीच्या आधारे खात्रीने म्हणेन की इयत्ता पहिलीचा वर्ग म्हणजे जणू काही दुसरा स्वर्ग!!



काहीजण म्हणतात स्वर्ग आकाशात असतो, काहीजण म्हणतात कोकण म्हणजे स्वर्ग, काहीजण म्हणतात किल्ले रायगड म्हणजे स्वर्ग, काहीजण म्हणतात जन्मगाव म्हणजे स्वर्ग. काहीजण म्हणतात पृथ्वीवरचा स्वर्ग म्हणजे स्वित्झर्लंड. पण तुम्ही कधी प्राथमिक शाळेत पहिलीच्या वर्गात गेलात का? कारण तुमच्या मनामध्ये स्वर्गाबाबतच्या ज्या काही कल्पना आहेत त्या सर्व कल्पना पहिलीच्या वर्गात अनुभवायला मिळतील. म्हणजे याचा अर्थ काय तर इयत्ता पहिलीचा वर्ग म्हणजे जणू काही दुसरा स्वर्ग!!

जोधा अकबर या हिंदी चित्रपटातील उत्कृष्ट संवादानुसार स्वर्ग म्हणजे काय? याचं खूप सुंदर उत्तर दिलेलं आहे. फरिश्तो से पूछा गया, जन्नत क्या है? उन्होने जवाब दिया, जिस दिल में मोहब्बत होती है, उसे जन्नत कहते है। नेमकं याच संवादानुसार इयत्ता पहिलीतल्या प्रत्येक मुला – मुलीचं हृदय प्रेमाने भरलेले असते. त्यांच्या मनामध्ये आणि डोळ्यांमध्ये निरागस भाव असतो. त्यांच्या हृदयाचा प्रत्येक कोपरा सकारात्मक विचाराने तुडुंब भरलेला असतो. पावलो- पावली त्यांच्या डोळ्यांना या सृष्टी मध्ये प्रेम आणि प्रेमच दिसते. तर मग इयत्ता पहिलीचा वर्ग म्हणजे खरोखरच दुसरा स्वर्ग.

गाढवाचं लग्न या प्रसिद्ध मराठी चित्रपटातील सावळा ज्यावेळेस बुवाबरोबर स्वर्गात जातो त्यावेळेस तो स्वर्गातील अप्सरा पाहून जसं आश्चर्यचकित होतो तसं तुम्ही इयत्ता पहिलीच्या वर्गात गेल्यानंतर आप्सरेपेक्षा सरस असलेल्या त्या नटलेल्या मुली, त्या रागीट मुली, त्या नखरेबाज मुली, प्रचंड ऊर्जा मनामध्ये आणि शरीरामध्ये असलेल्या त्या ऊर्जादायक आणि प्रेरणादायक मुली पाहिल्या की असे भासेल की इयत्ता पहिलीचा वर्ग म्हणजे जणू काही दुसरा स्वर्ग!

वारकरी पंढरपूरला त्यांचा स्वर्ग समजत असतील, शेतकरी शेतीला त्यांचा स्वर्ग समजत असतील, दुकानदार त्यांच्या दुकानाला स्वर्ग समजत असतील, गावकरी गावातल्या मंदिराला स्वर्ग समजत असतील परंतु जिथे जिता – जागता, जिवंत हाडामासाचा बोलका स्वर्ग पाहिला मिळतो तो म्हणजे शाळेतला इयत्ता पहिलीचा वर्ग. तुम्ही कधी पहिलीच्या वर्ग मध्ये गेलात आणि समजा तुम्ही आजारी असाल तर तुम्ही तुमचा सर्व आजार विसरून जाता. तुम्ही दुःखी, कष्टी असाल तर तुम्हाला तुमच्या सगळ्या दुःखाचा विसर पडेल. एकंदर काय तर तुम्ही जेव्हा शाळेतल्या इयत्ता पहिलीच्या वर्गात जाता तेव्हा तुम्ही सर्व जग विसरता. सर्व जग विसरवायची ताकद इयत्ता पहिलीतल्या विद्यार्थ्यांमध्ये आहे म्हणजे एवढा आनंद, एवढी ऊर्जा हे पहिलीचे विद्यार्थी पाहून आपणाला मिळते. एकंदर काय तर इयत्ता पहिली चा वर्ग म्हणजे दुसरा स्वर्ग.

हिंदू पुराणांनुसार अप्सरा या स्वर्गाधिपती इंद्राच्या दरबारात नृत्यगायन करणाऱ्या स्वर्गीय सुंदऱ्या होत्या. त्यानुसार आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या (InformationTechnology) युगात पहिलीतल्या मुली शाळेच्या दरबारात नृत्य गायन करणाऱ्या नृत्यांगनापेक्षा सुंदर तर आहेतच पण त्याचबरोबर उत्कृष्ट अध्ययनार्थी, उत्तम ज्ञानार्थी, कुशल परीक्षार्थी, खिलाडू वृत्तीच्या खेळाडू, गान कोकिळा लता मंगेशकर सारख्या गायिका, १९८६ साली दक्षिण कोरियाच्या सोल इथं झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत ४ सुवर्णपदकं मिळवलेल्या पी टी उषा सारख्या उत्कृष्ट धावक, सलग तीन वेळा भारताच्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी सारख्या उत्कृष्ट राजकारणी सुद्धा आहेत त्यांच्याशिवाय घरात आणि शाळेत काडी सुद्धा हलत नाही.

इयत्ता पहिलीचा वर्ग म्हणजे स्वर्ग कारण पहिलीतला प्रत्येक मुलगा आणि मुलगी म्हणजे वरिष्ठांच्या प्रति आदरभाव आणि कनिष्ठांच्या प्रति करुणा भाव बाळगणारा, वेद वाचण्यापेक्षा दुसऱ्याच्या वेदना वाचणारा, मुक्या प्राण्यावर आणि पशुपक्षावर स्वतःच्या बहिण – भावा इतकं आणि आई-वडील इतकं प्रेम करणारा, कोणत्याही बाबतीत दुसऱ्याला निस्वार्थ सेवा देणारा, कुठल्याही प्रसंगी साधं, सोपं, सरळ आणि निर्मळ दिसणारे आणि वागणारे मुलं म्हणजे इयत्ता पहिलीतले मुलं. आता तुम्ही थोडसं चिंतन करा की इयत्ता पहिली चा वर्ग म्हणजे स्वर्ग नाही का?

पहिलीचा वर्ग म्हणजे आपल्या आयुष्यात शिक्षणाच्या यशोगाथेचा श्री गणेशा असतो.पहिलीच्या वर्गातील वर्षभरातील गमती जमती आयुष्यभर गोड स्मृती बनत असतात.एवढेच नाही तर आयुष्यभर सोबत देतील असे मित्र याच वर्गापासून मिळत असतात. अशा या गोड स्मृतीचा कायम ठेवा असणार्‍या इयत्ता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थी त्या वर्गासाठी शिकवित असलेल्या शिक्षकांबद्दल आयुष्यभर नेहमी एक नम्र, विनय भाव मनामध्ये ठेवत असतात. अशी ही उमलती फुल म्हणजे आनंदाचा ठेवा असतात. आता आपल्या मनामध्ये साहजिकच एक प्रश्न निर्माण झाला असेल कि जर स्वर्गाची देखभाल करणारे देव असतील तर पहिलीच्या वर्गाची देखभाल करणारे वर्गशिक्षक देव ठरतील का? जर तुमचे उत्तर होय असेल तर इयत्ता पहिलीच्या वर्गाचे वर्गशिक्षक खरंच धीं रीश सीशरीं !



**गुणवंत सौदागर खोसे,**
प्राथमिक शिक्षक
जि.प.प्रा.मराठी शाळा नाविंदगी
ता. अक्कलकोट जि.सोलापूर
मो. ८८८८५५९६५०

पान १ वरुन

### अरुंधती रॉय यांच्यावर खटला..

हुसेन यांच्याकडून लगेच कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. काश्मीरमधील सामाजिक कार्यकर्ते सुशील पंडित यांच्या तक्रारीवरून २८ ऑक्टोबर २०१० रोजी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती.

राज निवासच्या अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले की, ''दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही के सक्सेना यांनी अरुंधती रॉय आणि काश्मीरमधील सेंट्रल विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय कायद्याचे माजी प्राध्यापक डॉ. शेख शौकत हुसेन यांच्याविरुद्ध बेकायदा कृती (प्रतिबंध) कायद्याच्या कलम ४५ (१) अन्वये खटला चालवण्यास मान्यता देण्यात आली आहे. रॉय आणि हुसेन यांनी २१ ऑक्टोबर २०१० रोजी येथील कोपर्निकस मार्गावरील एलटीजी सभागृहात 'आझादी – एकमेव मार्ग' या बॅनरखाली आयोजित परिषदेत प्रक्षोभक भाषणे केली होती.

### जिल्ह्यातील एक लाख ९० हजार

शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण करून त्यापैकी २५ हजार ९५४ पात्र शेतकऱ्यांना रक्कम रुपये २४.९५ कोटी निधी वितरित करण्याची कार्यवाही पीक विमा कंपनी मार्फत सुरू आहे तसेच काढणी पश्चात नुकसानी अंतर्गत २१ हजार ३८४ पूर्व सूचनेपैकी १४००० ४५४ पंचनामे पूर्ण झाले असून शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची परिणाम करण्याची कार्यवाही पीक विमा कंपनी नंतर सुरू झाली आहे तसेच पीक कंपनी प्रयोगातील उत्पादनाच्या आधारे अंदाजे एक लाख ८० हजार शेतकऱ्यांना रक्कम रुपये ७०.४७ कोटी नुकसान भरपाई देय आहे परंतु हंगामामध्ये प्रतिकूल परिस्थिती व स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसानीच्या वैयक्तिक पूर्व सूचनेतील लाभार्थ्यांच्या यामध्ये सामवेस असल्याने वैयक्तिक पंचनाम्यातील शेतकऱ्यांचा निधी वितरित केल्यानंतर उर्वरित दे रक्कम पीक कंपनी प्रयोगातील उत्पादनाच्या आधारे आधार करण्यात येणार आहे यामध्ये प्रामुख्याने मूग उडीद बाजरी या पिकाच्या समावेश असल्याची माहिती पिक विमा कंपनीने दिले असलेले जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री गवासने यांनी कळविलेले आहे पिक विमा अग्रीम मिळवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा पाठपुरावा

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२३ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील आहे ऑगस्टमध्ये पावसातील खंडामुळे खरीप पिकाच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता लक्षात घेता प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ९२ महसूल मंडळी व १८ तालुक्यातील विमाधारक शेतकऱ्यांना संभाव्य नुकसान भरपाई रकमेच्या पंचवीस टक्के आगाव रक्कम देण्याबाबत पीक विमा कंपनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद जिल्हास्तरीय झालेल्या आठ बैठकामध्ये तसेच लेखी पत्राद्वारे वारंवार सूचना देऊन तसेच फार मुख्य सचिव मुख्य विभाग आयुक्त कृषी महाराष्ट्र राज्य यांच्याशी दूरध्वनीद्वारे तसेच कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य पालकमंत्री सोलापूर यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली व त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पाठपुरावा केला होता तर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याण सिटी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केलेला होता तसेच जिल्ह्यातील अन्य लोकप्रतिनिधी हेही शेतकऱ्यांना पिक विमा मिळवण्यासाठी पाठपुरावा करत होते

तसेच सोयाबीन अग्रीम बाबत विमा कंपनीने विभागीय आयुक्त यांच्याकडे दाखल केलेल्या अपीलातील सर्व मुद्दे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यापूर्वीच खोडून काढलेले होते हे सर्व बाबींमुळे व प्रशासनाच्या सातत्यामुळे पाठपुराव्यामुळे ओरिएंटल पिक विमा कंपनीने शेतकऱ्यांना अग्रीम रक्कम देणे अनिवार्य झाले होते

### मोदींची सुनक, माक्रॉं,

द्विपक्षी संबंधांवर चर्चा केली. व्यापार, तंत्रज्ञान आणि संरक्षण या क्षेत्रांमध्ये परस्परसंबंध वृद्धिंगत करण्याच्या दिशेने आश्वासक पावले टाकली जात असल्याचे दोन्ही नेत्यांनी म्हटले आहे. विक्रमी तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून निवड झाल्याबद्दल मोदी यांचे सुनक यांनी अभिनंदन केले. तर ब्रिटनमधील आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी मोदी यांनी सुनक यांना शुभेच्छा दिल्या.

संरक्षण, अणुऊर्जा, अंतराळ अशा क्षेत्रांमध्ये भारत–फ्रान्स सहकार्य वाढवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे पंतप्रधान मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमान्युएल माक्रॉं यांनी म्हटले आहे. जी ७ परिषदेच्या निमित्ताने या दोन नेत्यांमध्ये द्विपक्षी चर्चा झाली. एका वर्षात हे दोघे चार वेळा भेटले आहेत. कृत्रिम प्रज्ञेच्या क्षेत्रातील नियमनाबाबत आणि सार्वजनिक क्षेत्रातील डिजिटीलकरणाबाबत भारताने घेतलेल्या पुढाकाराचे माक्रॉं यांनी या आवर्जून कौतुक केले.

### अजित पवारांना भाजपाकडून..

टीका करणारा व्यक्ती कितीही मोठा असू द्या मी सोडत नाही. असंही आव्हाड माध्यमांशी बोलताना म्हणाले. मी कधीही शरद पवार रागावतील याचाही विचार करत नाही. शरद पवार माझे बॉस त्यांच्यावर कुणीही बोलणार असेल तर मी सोडत नाही असंही आव्हाड म्हणाले. राज्यातील पराभवाला अजित पवार जबाबदार असतील तर भाजपच्या उत्तर प्रदेशातही कमी जागा आल्या. तिथेही कुठल्या अजित पवारांना शोधलं आहे का? तसंच अजित पवार गटाकडून आमच्यावर टीका होते आहे, मात्र गजा मारणेबरोबर चहा प्यायला कोण गेलं होतं? जिनके घर शिशे के होते हैं, वो दुसरो के घरोपर पत्थर नहीं फेका करते. असं आव्हाड म्हणाले. तसंच भाजपाकडून अजित पवारांना बाजूला करण्याचा प्रयत्न होतो आहे. चारही बाजूंनी त्यांच्यावर हल्ले होत आहेत असाही आरोप आव्हाड यांनी म्हटलं आहे.

### पालखी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी ..

मनुष्यबळ अधिक संख्येने ठेवण्यात आले आहेत. रस्त्याची सुरू असलेली कामे पालखी सोहळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे आषाढी वारीसाठी प आणि प्रशासनातर्फे संपर्क पुस्तिका तयार करण्यात येईल. स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सुरक्षा आणि वाहतूक नियोजनाबाबत माहिती दिली.

यावेळी लोकप्रतिनिधींनी पालखी सोहळ्यासाठी आवश्यक सूचना केल्या. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते पालखी सोहळ्यादरम्यान करण्यात येणाऱ्या शौचालय सुविधांची माहिती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पचे लोकार्पण करण्यात आले.

पुणे जिल्ह्यात तयारी अंतिम टप्प्यात

जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी पुणे जिल्ह्यात केलेल्या पूर्वतायरीची माहिती दिली. पालखी सोहळ्यासाठी ३ हजारपेक्षा अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जेजुरी पालखी तळाची कामे सुरू करण्यात आली आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार ८००, श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार २०० आणि संत सोपान महाराज पालखी सोहळ्यासाठी २५० शौचालयांची सुविधा करण्यात येणार आहे. आषाढी वारीसाठी २०० पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली असून ४५ ठिकाणी पाणी भरण्याची सुविधा असणार आहे. ११२ वैद्यकीय अधिकारी आणि ३३६ कर्मचाऱ्यांची आरोग्यसेवेसाठी पालखी मार्गावर नियुक्ती करण्यात आली आहे. ११५ आरोग्य पथके, ५७ फिरते वैद्यकीय पथक आणि १७९ रुग्णवाहिकेद्वारे आरोग्य सुविधा करण्यात येणार आहे. १२ ठिकाणी हिरकणी कक्ष उभारण्यात येईल.अन्न व औषध प्रशासनातर्फे खाद्य आणि पेय पदार्थांची तपासणी करण्यात येणार आहे. मोबाईल टॉवरची नेटवर्क फ्रिक्वेंसी वाढविण्यात येणार आहे. पालखी मार्गावर असलेल्या शासकीय आणि खाजगी रुग्णालयातील १० टक्के खाटा आरक्षित ठेवण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

सातारा जिल्ह्यातील नियोजन


अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी सातारा जिल्ह्यातील नियोजनाची माहिती दिली. दत्त घाटाचे काम ३० जूनपर्यंत पूर्ण करण्यात येईल. पालखी तळ आणि विसाव्याच्या ठिकाणी आवश्यक सुविधा व दुरुस्ती करण्यात येत आहे. लोणंद पालखी तळावर नियंत्रण कक्ष उभारण्यात येणार आहे. येथे २५ फिरते आरोग्यदूत आणि ८ आरोग्य पथके असतील.

पालखी सोहळ्यासाठी आवश्यक सुरक्षा, पिण्याचे पाणी आणि वाहतूक नियोजनाबाबत व्यवस्था करण्यात आली आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात औषधांची सुविधा करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी पालखी प्रमुखांनी प्रशासनाला सूचना केल्या. त्या सूचनेनुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिले. बैठकीस श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री संत सोपान महाराज पालखी सोहळा, श्री संत निळोबाराय संस्थान, श्री संत चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पदाधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते

# यूपीएससी पूर्व परीक्षेसाठी परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रावर अर्धा तास आधी उपस्थित राहणे अनिवार्य

मुंबई : केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा (णझडउ) २०२४ ही दि. १६ जून २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रावर अर्धा तास आधी उपस्थित राहणे अनिवार्य आहे, असे मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांनी सांगितले.




मुंबई शहर जिल्ह्यात एकूण ३६ परीक्षा केंद्रावर ही परीक्षा घेण्यात येणार असून यासाठी एकूण १४ हजार ५०९ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

ही परीक्षा ही परीक्षा दोन सत्रात होणार आहे. पहिल्या सत्राची वेळ सकाळी ९.३० ते ११.३० (पेपर – ०१) आणि दुसऱ्या सत्राची वेळ दुपारी २.३० ते ४.३० (पेपर – ०२) अशी आहे.केंद्रीय लोकसेवा आयोगाने यापूर्वीच निर्गमित केलेल्या ३० ऑक्टोबर २०२४ रोजीच्या लेखी सूचनेनुसार परीक्षार्थींनी आपल्या नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास (३० मिनट) अगोदर हजर राहणे अनिवार्य केले आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व परीक्षार्थींनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सूचनेनुसार परीक्षा केंद्रावर अर्धा तास (३० मिनिट) अगोदर उपस्थित रहावे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# वारकरी संप्रदायाच्या समाजहितैशी मूल्यांचे संत चोखामेळा समता पुरस्कार प्राप्त व्यक्तीमत्वाच्या कार्यात दर्शन घडते : ह.भ.प.दिपकजी महाराज तेर

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भागवत संप्रदाय अर्थात वारकरी संप्रदायाने पंढरपूर च्या वाळवंटात सर्व समाज घटकातील संताना एकत्र आध्यात्मिक लोकशाहीची स्थापना करत समता, बंधुता व मानवता या मूल्यांची अनमोल भेट समाजाला दिली. वारकरी संप्रदायाच्या याच समाजहितैशी मूल्यांचे संत चोखामेळा समता पुरस्कार प्राप्त व्यक्तीमत्वाच्या कार्यात दर्शन घडते आहे .असे प्रतिपादन सकल संत चरित्र कथाकार , संत साहित्याचे गाढे अभ्यासक ह भ प दीपकजी महाराज तेर यांनी केले .

संत चोखामेळा अध्यासन केंद्र व वृंदावन फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने संत चोखामेळा महाराज यांच्या ६८६ व्या पुण्यतिथी संजीवन समाधी दिन निमित्ताने आयोजित संत चोखामेळा समता समता पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते .

वारकरी संतांनी कृतीशील आचरणाद्वारे सांगितलेल्या सामाजिक एकता , बंधुभाव अन मानवतावादी मूल्यांना केंद्रस्थानी मानून सामाजिक एकतेसाठी अविरतपणे कार्यरत




असलेले संत चोखामेळा महाराज जन्मभूमी मेहुणाराजा जि बुलढाणा येथील संत चोखामेळा जन्मोत्सव सोहळ्याचे प्रणेते माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ ( बुलढाणा ) व संत विचारांचा जागर आधुनिक माध्यमाद्वारे अधिक समर्थपणे करणारे लोकप्रिय कीर्तनकार प्रवचनकार महंत ह भ प पुरुषोत्तमदादा पाटील (आळंदी ) यांना संत चोखामेळा समता पुरस्कार देउन ह भ प दिपकजी महाराज यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह , सन्मानपत्र ,शाल , पुष्पगुच्छ , श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले , पुणे विद्यापीठ पुणे च्या संत ज्ञानदेव , संत नामदेव व संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रो .डॉ. ओम श्रीश श्रीदत्तोपासक होते . याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणजे ज्येष्ठ विचारवंत , माजी खासदार प्रो .डॉ. सुनीलराव गायकवाड , किमान वेतन सल्लागार मंडळ , महाराष्ट्र राज्य अध्यक्ष , कामगार नेते डॉ. रघुनाथराव कुचिक उपस्थित होते . उद्योजक अण्णासाहेब वावरे , साहित्यिक श्यामसुंदर मुळे आदी मान्यवर उपस्थित होते .

ज्येष्ठ गांधीवादी आ.हर्षवर्धन सपकाळ बुलढाणा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असतांना त्यांच्याच संकल्पनेतुन संत चोखामेळा जन्मोत्सव सोहळ्याची बुलढाणा जिल्हा परिषद यांच्या वतीने मेहुणाराजा येथे सुरुवात झाली , यास यावर्षी २५ वर्षे पूर्ण झाली. सपकाळ यांनी आत्यंतिक श्रद्धेने सुरु केलेला जन्मोत्सव सोहळा आज मोठया प्रमाणात साजरा होतो. प्रतीवर्षी राज्यातील चोखामेळा भक्त , अभ्यासक संशोधक या सोहळ्यास हजेरी लावतात , संत चोखामेळा जन्मोत्सव सोहळा सोबतच संत चोखामेळा महाराज व कुटूंबातील अन्य संतांच्या विचार संवर्धन उत्कर्ष कार्यात सपकाळ सक्रिय असतात त्यांच्या संत चोखामेळा यांच्या विचार प्रसार कार्याबद्दल त्यांना संत चोखामेळा समता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यातआले .

सोबतच वारकरी संप्रदायातील लोकप्रिय कीर्तनकार प्रवचनकार ह भ प श्री महंत पुरुषोत्तम दादा पाटील आळंदीकर हे आधुनिक माध्यमाद्वारे वारकरी विचारांचा सातत्याने प्रचार प्रसार करत असतात ,

तरुण पिढीस समजेल अशा साध्या सोप्या भाषेतील मांडणीद्वारे ते संत विचार घेउन प्रबोधन करत आहेत .संत चोखामेळा समता पुरस्कार देउन ह भ प पुरुषोत्तम पाटील यांनाही सन्मानित करण्यात आले . पाटील महाराज हे आळंदी येथील श्री सद्गुरु अमृता स्वामी मठाचे विद्यमान मठाधिपती आहेत तसेच झी टॉकीज वरील कीर्तन मालिका गजर कीर्तनाचा सोहळा आनंदाचा व मन मंदिरा गजर भक्तीचा या कार्यक्रमाचे प्रमुख सल्लागार आहेत .

ह भ प पुरुषोत्तमदादा पाटील यांना आध्यात्मिक तर आ. हर्षवर्धनदादा सपकाळ यांना सामाजिक गटातून संत चोखामेळा समता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक संत चोखामेळा अध्यासनाचे संस्थापक सचिन पाटील यांनी तर आभार ह भ प वसंतराव आण्णा पवार महाराज यांनी तर निवेदन ज्येष्ठ विश्र्वस्त ह भ प प्रसाद माटे महाराज यांनी केले . वारकरी संतांनी सांगितलेल्या मार्गाने जनसेवेच्या कार्यात प्रामाणिकपणे गढून गेलेल्या व्यक्तीमत्वाच्या गौरव सोहळ्यास मुंबई , पुणे , सोलापूर , बुलढाणा ,सातारा , धाराशिव लातूर आदी जिल्ह्यातून संत चोखामेळा प्रेमी उपस्थित होते.

# नळदुर्ग येथील भ्रष्टाचाराची कीड लागलेली एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास निर्मूलन योजने अंतर्गत बांधलेले घरकुले कोसळली

## पहिल्याच पावसात घरकुलातील लाभार्थी रोडवर नगर प्रशासनाने नोटीस देऊन जखमीवर मिठ चोळले

**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे**

नळदुर्ग येथे बारा वर्षांपूर्वी केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास निर्मूलन श्रक्हउ्झ योजने अंतर्गत बांधण्यात आलेली घरकुल योजना हे एकदम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे उघडकीस आल्याने तत्कालीन मुख्याधिकारी नगर अभियंता काही माझी पदाधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल झालेला असून आज प्रकरण कोर्टात चालू आहे परंतु हे घरकुल योजना गोरगरीब जनतेच्या विकासासाठी होती परंतु नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात भ्रष्टाचारांची कीड लागलेली दिसून आली

केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास निर्मूलन योजने अंतर्गत ही घरकुल योजना प्रभावी पणे राबवायला पाहिजे होती परंतु नगर प्रशासनाने आणि तत्कालीन मुख्याधिकारी नगर अभियंता काही पदाधिकारी आणि कंपनी यांनी कसली ही गरिबांची काळजी न करता स्वतःची पोळी भाजून घेण्याचे प्रभावी काम केले आहे यांच्या या खोडसाळ पणामुळे या घरकुल योजने पासुन वंचित आहेत . जे नागरीक घरकुलात राहातात आसे घरकुल चक्क कोसळली आहेत तरीही नागरिक घरकुल सोडायला तयार नाहीत . केवळ तत्कालीन मुख्याधिकारी अभियंता आणि पदाधिकारी आणि कंपनी या योजनेला जबाबदार असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे

आजची परिस्थिती नागरिकांचे खूप हलक्याची असल्याने जागा विकत घेणे आणि घरकुल बांधकाम करणे हे परवडणारे नाही गरीबांची आजची परिस्थिती आहे ते कुटुंब खाण्या पिण्याला मोताज आहे .



लाभार्थी पडक्या घरकुलातच राहुन आपला जीव मुठीत घेऊन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत तरी ही आज जे लाभार्थी या घरकुलात राहतात अशा लाभार्थ्यांना नगर प्रशासनाने नोटीस बजावलेली आहे की तात्काळ हे घरकुल निकृष्ट दर्जाची झालेली आहेत घरकुलाचे ऑडिट सुद्धा झालेल आहे तुम्ही घरकुले तात्काळ खाली करा अशा पद्धतीची नोटीस देऊन नगरपालिकेने दिन दलितांच्या गरिबांच्या दुःखावर मीठ चोळले आहे .

अनेक वर्ष झाले नळदुर्ग शहरात जे नागरिक गेल्या ७० ते ८० वर्षापासून कोणी पत्र्याचे शेड तर कोणी कच्च्या मातीचे घर बांधून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाहासाठी करत आहेत ज्या नागरिकांना जागा ही नाही आणि घर ही नाही आशा नागरिकांनी करायचे का हा खूप मोठा प्रश्र्न नागरिकासमोर भेडसावत आहे परंतु नगर प्रशासनाला किंवा वरिष्ठांना या गरीब कुटुंबाची कसलीही दया मया आलेली नाही अनेक वेळेस आंदोलने झाली उपोषणे झाली अनेक वेळेस निवेदने ही दिली तरी ही नगर परिषदेला व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांना गरीब नागरीक या योजनेपासून वंचित आहेत वंचित असलेल्या लाभार्थ्यांकडे अधिकारी जातीने लक्ष देत नाहीत .

केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या वेगवेगळ्या घरकुल आवास योजना राबवल्या जातात परंतु या योजना स्वतःची जागा नसल्याने जे नागरिक शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहतात अशा लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे व पक्के घर देण्याकरिता प्रशासनाकडे खूप मोठा पाठपुरावा केला होता परंतु नगर प्रशासन वरिष्ठाकडून या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे नळदुर्ग शहरांमध्ये जी एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास निर्मलन योजने अंतर्गत जे घरकुल बांधकाम झालेले आहेत ते ही घरकुल निकृष्ट दर्जाचे झाले असून त्यामध्ये खूप मोठा गैर व्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे यामुळे घरकुल योजनेचा तीन तेरा नऊ अठरा झाल्या आहेत

या योजनेला आपल्याच माणसाने भ्रष्टाचाराची कीड लागल्याने हे घरकुल जमीन दोस्त झाले आहेत याला जबाबदार तत्कालीन मुख्याधिकारी कंपनी आणि पदाधिकारीच आहेत आता तरी नगरपालिकेने या गरीब दलित जनतेकडे जातीने लक्ष देऊन त्या योजना प्रत्येकाना देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावा आता तरी प्रशासनाला या गोर गरीब जनतेची किव आली पाहिजे आणि जाग ही आली पाहिजे जे लाभार्थी या कोसळलेल्या घरांमध्ये राहतात त्या नागरिकांचा जीव धोक्यात आहे .

याचे खापर नागरीकांच्या माथ्यावर फोडूनये

जे लाभार्थी विविध घरकुल योजनेपासून वंचित आहेत त्यांना राहण्यासाठी स्वतःचे घर नाही आणि जागा ही नाही आसे लाभार्थ्याने जायचे कुठे या पद्धतीचा प्रश्र्न आजच्या लाभार्थ्यांना भेडसावत आहे नगर पालिकेने तात्काळ या गोष्टीचा विचार करून संबंधिताला त्यांचे हक्काचे पक्के घर बांधकामा साठी जागा नियमाकुल करून द्यावी अशी मागणी नळदुर्ग शहरातून जोर धरत आहे .

# खासदार बाळ्या मामा यांनी घेतली भिवंडी मनपा आयुक्तांची भेट;शहर विकासाच्या कामांचा घेतला आढावा...

**भिवंडी/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी शुक्रवारी भिवंडी मनपा आयुक्त अजय वैद्य यांची भेट घेऊन शहर विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा केली.भिवंडी शहर हे कामगार व मुस्लिम बहुल वस्ती असलेले शहर असल्याने पावसाळ्यात व पावसाळ्यापूर्वी मनपा प्रशासनाच्या असलेल्या जबाबदाऱ्या, शहरातील नाले सफाई,धोकादायक इमारती,रस्त्यांची अपूर्ण कामे,कचरा समस्या व येणाऱ्या बकरीईद सणानिमित्त करण्यात येणाऱ्या सोयी सुविधांचा आढावा यावेळी खासदार म्हात्रे यांनी घेतला.यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष शोएब गुड्डू,माजी उपमहापौर इम्रान खान,माजी नगरसेवक मतलुब सरदार,हालीम अंसारी यांच्यासह मनपा उपायुक्त व अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भेटी दरम्यान माजी नगरसेवक व मनपा अधिकारी यांच्या उपस्थितीत शहर विकासाच्या मुद्यांवर चर्चा करण्यात आली.शहरातील नाले सफाईच्या मुद्यांवर व बकरी ईद सणात मनपा प्रशासनाकडून योग्य ती खबरदारी मनपा प्रशासनाकडून घेतली जात नाही त्यामुळे दरवर्षी शहरात बकरीईद सणानंतर प्रचंड दुर्गंधी व घाण पसरलेली असते,त्यामुळे यावेळी मनपा प्रशासनाने त्याकडे विशेष लक्ष द्यावे अशी मागणी यावेळी माजी नगरसेवकांनी मनपा आयुक्तांकडे केली. यावेळी मनपा आयुक्त अजय वैद्य यांनी बकरी ईद सणासाठी मनपा प्रशासन सज्ज झाले असून मनपा कर्मचारी व कामगार युनियन यांच्याशी चर्चा करण्यात आली असून बकरी ईद सणात मनपा प्रशासनाकडून कोणतीही कसर राहणार नाही असे आश्र्वासन यावेळी मनपा आयुक्त अजय वैद्य यांनी उपस्थित माजी नगरसेवकांना दिले.

पावसाळी आपत्कालीन परिस्थितीचा आढावा व बकरी ईद सणात मनपा प्रशासनाने केलेल्या सोयी सुविधांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला मनपा प्रशासन बकरीईद सणासाठी



सज्ज असल्याची ग्वाही यावेळी मनपा आयुक्तांनी आपल्याला दिली असून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या या मुद्द्याकडे आपण स्वतः सर्व सोयी सुविधांकडे विशेष लक्ष देणार असल्याची प्रतिक्रिया खासदार बाळ्या मामा यांनी यावेळी दिली आहे.

# संत चोखामेळा अध्यासन केंद्राच्या मध्यवर्ती विश्वस्त मंडळावर धोंडप्पा नंदे यांची निवड

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

संत चोखामेळा अध्यासन केंद्र या संत चोखामेळा महाराज व त्यांच्या परिवारातील सर्व सदस्य यांचे साहित्य , जीवन , कार्य इ संबंधित संशोधन व प्रचार प्रसार जागृतीचे कार्य करत असलेल्या सोबतच वारकरी संप्रदायातील मानवतावादी , बंधुतावादी व समतावादी मूल्यांच्या उत्कर्ष – संवर्धन सोबतच प्रचार प्रसार कार्यात अग्रणी राहत सामाजिक एकतेच्या कार्यात सातत्याने सजग असलेल्या संत चोखामेळा अध्यासन केंद्र या संस्थेच्या मध्यवर्ती विश्र्वस्त मंडळावर ग्रामीण जनजीवन व तेथील प्रश्र्नांचे अभ्यासक , लोकसंस्कृतीचे संवर्धक , सामाजिक सांस्कृतिक परिघात कार्यरत सा गावगाथा चे संस्थापक संपादक पत्रकार धोंडप्पा नंदे यांची निवड .



संत चोखोबांचे अभंग काळाला जिंकून अमर झालेत , त्यातील बंडखोरीच स्फुल्लिंग बावनकशी आहे . मराठी साहित्य विश्र्वात त्याला तोड नाही ... संत , कवी आणि माणूस म्हणूनही चोखोबा ' मोठे 'च होतेच , त्यांच्या अभंगात भक्ती, तळमळ, आध्यात्मिक उंची तर दिसेतच, तसेच उपेक्षेची खंत ही जाणवते आणि 'वेदनेचा सूर' ही लागलेला दिसतो, जो आजही आपले अंत:करण हेलावून टाकतो.संत चोखामेळा यांच्या साहित्यकृतीचा जास्तीत प्रचार प्रसार व्हावा या हेतूने संत चोखामेळा साहित्य संमेलन , संत चोखामेळा व परिवार यांच्यावरील संशोधित ग्रंथ संपदा निर्मिती , संत चोखामेळा समता पुरस्कार , चोखोबा ते तुकोबा एक वारी समतेची ,आदी उपक्रम सातत्याने सुरु असतात . संत चोखामेळा अध्यासन केंद्राच्या अध्यक्षा मा प्राचार्या उल्काताई चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखालील विश्र्वस्त मंडळात धोंडप्पा नंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आलेली आहे . संत चोखामेळा महाराज यांच्याशी संबंधित विचार प्रसार कार्यासोबतच भागवत संप्रदाय अर्थात वारकरी संप्रदायाने सांगितलेल्या समता , मानवता , बंधुता व सामाजिक न्याय या समाजहितकारक मुल्यांचा जागर करतांना नवीन विश्र्वस्त तन मन धन याद्वारे सहभागी होतील अशा आशयाचे नियुक्तीपत्र संत चोखामेळा अध्यासनाचे संस्थापक सचिन पाटील यांनी नवीन विश्र्वस्तांना दिले आहे .

# विजेचा धक्का लागून बापलेकांचा मृत्यू

## मेरा बुद्रुक गावावर शोककळा.





**बुलढाणा/ राहुल साबळे**

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक गावातील रहिवासी असलेले रामेश्र्वर उत्तम पडघान वय ४६ वर्ष हे शेतामध्ये काम करत होते. काल मुरातपूर शिवारात शेतामध्ये दोघे बापलेक काम करत असताना जिवंत विद्युत तारेला स्पर्श झाल्यामुळे त्यांचा मुलगा वैभव उर्फ पप्पू वय अंदाजे १९ दोन वर्ष काम करत असताना त्याला जोरदार झटका लागला. मिळालेल्या माहितीनुसार त्याचे वडील त्याला विद्युत झटका लागत असताना बाजूला उभे असलेले त्यांच्या वडिलांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ त्याला वाचविण्यासाठी अनेक प्रयत्न केले. केलेले अनेक प्रयत्न निष्फळ ठरत असताना शेवटी त्यांच्या गळ्यातील रुमालाच्या साह्याने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच्या अंगाला विद्युत तार गुंडाळलेली असल्यामुळे तारे सगट तो बापाकडे खेचला गेला. त्यामध्ये बापालाही विद्युतचा जोरदार झटका लागला. त्यामुळे त्यांचाही त्यामध्ये दुर्दैवी असा मृत्यू झाला. मृतक पावलेल्या इसमाला दोन मुले होती. त्यापैकी हा मृत झालेला लहान मुलगा होता तर त्याचा मोठा भाऊ इंजिनिअरिंग शिक्षण घेत आहे. घटनेची माहिती मिळताच अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील सह, दुय्यम ठाणेदार , कर्मचारी, पंचा समक्ष यांनी धाव घेऊन घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पंचा समक्ष पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी प्राथमिक प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली येथे मृतदेह पाठवण्यात आले होते. घटनास्थळावर नागरिकांनी खूप गर्दी केली होती.

शवविच्छादनानंतर रात्री साडेदहा वाजता शोकाकुल वातावरणात त्या दोघाबापलेकावर त्यांच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीसाठी मेरा बुद्रुक सह पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पुढील तपास अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करीत आहे. घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे मेरा बुद्रुक सह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. संपूर्ण मेरा बुद्रुक गावावर शोक कळा पसरलेली आहे.

# आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाच्या कामाचा उपमुख्यमंत्र्यांकडून आढावा

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे पुणे शहरात संगमवाडी येथे उभारण्यात येत असलेल्या स्मारकाच्या कामाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आढावा घेतला. स्मारकाच्या पायांतर्गत सुरू असलेले पायलिंगचे काम जुलैच्या सुरुवातीपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.




विधानभवन येथे याविषयी झालेल्या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, मनपाचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे, मुख्य अभियंता बांधकाम युवराज देशमुख आदी उपस्थित होते.

क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे हे सर्वांना प्रेरणा देणारे महान व्यक्तीमत्व असून त्यांचे स्मारकही समाजाला प्रेरणा आणि लाभ देणारे व्हावे. त्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामाला गती द्यावी. काम सुरू असतानाच पुतळा तयार करणाऱ्यांकडेही मागणी नोंदवावी. लहुजी वस्ताद यांच्या कार्याची माहिती देणारे प्रसंग साकारण्याची व्यवस्था, कौशल्य विकास प्रशिक्षण, वसतिगृह आदी कामे गतीने करावेत. कामे दर्जेदार करावीत. निधीची कोणतीही कमतरता पडू दिली जाणार नाही, असेही ते म्हणाले.स्मारकासाठी जागेच्या अनुषंगाने काही अडचणी असल्यास जागेची मोजणी तात्काळ करुन घ्यावी. जागेसंबंधी न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्यास महानगरपालिकेने चांगल्यात चांगले वकील नेमावे. त्यासाठी वेळप्रसंगी राज्याचे महाधिवक्ता यांचीही मदत उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही श्री. पवार यांनी सांगितले.

# अखेर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी केली चंद्रभागेची पाहणी, अनेक प्रश्नांवर झाली चर्चा : गणेश अंकुशराव

**पंढरपुर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आषाढी वारी तोंडावर आलेली असतानाच सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी पालखी मार्ग, पालखी तळ आदींच्या सोयी सुविधांची पाहणी केली होती परंतु, चंद्रभागा वाळवंट व नदीची पाहणी केली नसल्याने आम्ही चंद्रभागेची पाहणी करावी अशी मागणी केली होती, अखेर जिल्हाधिकारी यांनी चंद्रभागा व वाळवंटाची पाहणी केली, यावेळी आम्ही त्यांच्याशी विविध प्रश्नांवर चर्चाही केली, अशी माहिती महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी दिली आहे.



आषाढी वारी तोंडावर आलेली असतानाच चंद्रभागेतील अवैध वाळु उपशामुळे पडलेले खड्डे बुजवणे, चंद्रभागा वाळवंटाची स्वच्छता होणे, अवैध वाळु उपसा रोखणे, नदीत मिसळणारे ड्रेनेजचे पाणी थांबवणे आदी विविध कामे तातडीने करणं गरजेचं असतानाही पंढरपुरातील महसुल अधिकारी अवैध वाळु उपशाला अभय देतात, मुख्याधिकारी स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात, वाळु उपशामुळे पडलेले खड्डे बुजवत नाहीत, त्यामुळे भाविकांच्या जीविताला धोका निर्माण होतो, तसेच पंढरपूर नगरपरिषदेच्या जुन्या पुरातन इमारतीवर झाडे झुडपे उगवली असुन यामुळे पंढरपुरचे पुरातन वैभव असलेल्या या इमारतीला धोका निर्माण झाला आहे. अशा विविध प्रश्नांकडं आज जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे लक्ष वेधण्याचा आम्ही प्रयत्न केला, आमच्या आदिवासी कोळी समाजाचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे यांच्या चंद्रभागेतील स्मारकाच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भातही चर्चा झाली असुन पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले आहेत.

आपल्या समोर अधिकारी हे प्रश्न सोडवु असे आश्वासन देतात मात्र नंतर याकडं सपशेल दुर्लक्ष करतात अशी तक्रारही आपण जिल्हाधिकारी यांच्याकडं केली असल्याची माहिती गणेश अंकुशराव यांनी दिली आहे.

**कार्यतत्पर जिल्हाधिकारी नक्कीच पंढरपुरातील कामचुकार अधिकार्यांना शिस्त लावतील**

सोलापूरचे नुतन जिल्हाधिकारी कुमार गौरव हे कार्यतत्पर अधिकारी असल्याने चंद्रभागा वाळवंटात होणार्या अवैध वाळु उपशाला ते नक्कीच चाप लावतील, आणि पंढरपुरातील बेशिस्त आणि कामचुकार प्रशासकीय अधिकार्यांना 'योग्य' शिस्त लागेल अशी आशा लागुन राहिली असल्याचे मत यावेळी गणेश अंकुशराव यांनी व्यक्त केले.

# हन्नुर येथील मिनी अंगणवाडीत महिला समुपदेशन कार्यक्रम संपन्न



**अक्कलकोट /गौतम बाळशंकर**

अक्कलकोट तालुक्यातील हन्नुर येथील मिनी अंगणवाडी येथे प्रभागातील महिलांचे समाउद्देशान कार्यक्रम घेण्यात आले. अभियान अंतर्गत पावसाळ्यामध्ये गर्भवती स्तदा माता महिलांनी कोणत्या प्रकारे काळजी घ्यावी. या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी प्राथमिक उपकेंद्राच्या आरोग्य सेविका मंजुषा जाधव उपस्थित होत्या. गरोदर मातांचे खाद्यपदार्थ कोणत्या प्रकारचे घेतले पाहिजे, वेळेवर घेतले पाहिजे. आरोग्य विषयक काळजी घेतले पाहिजे. सहा महिन्यानंतर मुलांना खाऊ घालणे, लहान मुलांचे नखं काढणे स्वच्छ ठेवणे स्वच्छता परिसरातील स्वच्छता ठेवणे या संदर्भातील सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर यांनी केले. यावेळी प्रभागातील गर्भवती माता स्तंभा माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


अंगणवाडी सेविका अशा इरवाडकर, मदतनिश अश्र्विनी इरवाडकर अशा सेविका मायावा घोडके, मनीषा बाळशंकर सविता बाळशंकर उपस्थित होते.

# पहिलाच पाऊस आला अन् गोर नाल्यावरील पुल वाहून गेला

## कुंदेवाडी व निफाड शिवारातील गोर नाल्याचे काम निकृष्ट दर्जाचे

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड व कुंदेवाडी शिवारातील गोर नाऱ्यावरील पूल पहिल्याच पावसाच्या पाण्याने वाहून गेला असून या नाल्या मध्ये पालखेड, पंचकेश्र्वर, देवपूर ,रानवड व नांदुर्डी, शिवारातील पाणी येऊन मिळते या नाल्यावरील पुलाचे काम दीड वर्षांपूर्वी जि प अंतर्गत २५ /१५ योजनेतून सदर काम झाले असून जि प व निफाड प.स.बांधकाम विभागाने या कामाकडे दुर्लक्ष केल्याने हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे ,या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग शाळकरी मुले ये जा करत होते, प्रवासासाठी हा रस्ता परिसरातील लोकांना महत्त्वाचा होता परंतु पहिल्याच पावसात पुलाचा एक भाग पूर्ण खचल्याने संपूर्ण भाग वाहून गेला आहे, कुंदेवाडी येथील शेतकऱ्यांचा व शाळकरी मुलांचा येण्या जाण्यासाठी आता मोठी कसरत करावी लागत असून संपर्क तुटला आहे याबाबत सदर विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली असूनही गोर नाल्यावरील पुलाचे काम त्वरित करण्यात यावे अशी मागणी बाळासाहेब ताडगे ,भरत कुशारे, सोमनाथ ताडगे, ऋषिकेश शिंदे, दत्तात्रय भालेराव, संतोष सोनवणे, सुरेश कदम ,जगन कदम, विनोद ढमे, विलास काळे, मंगेश भुजबळ, दत्तात्रेय ताडगे ,सुरेश मगर, साहेबराव कदम ,बाळासाहेब भालेराव, साहेबराव बेलदार, भगवान गाडे ,दीपक कदम, लक्ष्मण बेलदार, बाळासाहेब जेऊघाले, गोपीनाथ बैरागी, सुनील बेलदार, माधव ताडगे, यांनी केली आहे



जि ,प अंतर्गत २५ /१५ योजनेतून सदर रस्त्यावरील पुलाचे काम करण्यात आले होते, जि. प व निफाड प.स बांधकाम विभागाने या कामाकडे दुर्लक्ष केल्याने हे काम निकृष्ट दर्जाचे झाले म्हणून पहिल्याच पावसात सदर पूल वाहून गेला त्यामुळे शेतकरी वर्गाची, शाळकरी मुलांची व फार मोठी अडचण निर्माण झालीआहे यावरून असे दिसून येते की शासनाकडून सदर कामासाठी जो निधी आला त्याचा दुरुपयोग झाला आहे .संबंधित अधिकाऱ्याबरोबर दूरध्वनीवरून चर्चा केली असता राहुल महाजन या अधिकाऱ्याने उडवा उडवी चे उत्तर देत असल्याचे लक्षात आले, संबंधित ठेकेदाराला पद्धतशीरपणे पाठीशी घालण्याचा प्रयत्न दिसून येत आहे ,म्हणून या पुलाची त्वरित दुरुस्ती करून शेतकऱ्यांची अडचण दूर करावी अन्यथा शेतकरी वर्गाला बरोबर घेऊन मुले, बाळे, जनावरे घेऊन बिऱ्हाड आंदोलन करण्यात येईल तरी याची संबंधितांनी त्वरित दखल घ्यावी – **अनिल पा कुंदे उपनगराध्यक्ष निफाड नगरपंचायत**

# इकबाल नगर परिसरातील घाणीचे सावट त्वरित दूर करा : मिंलीद वानखेडे




**बुलढाणा / राहुल साबळे**

वंचित बहुजन आघाडी बुलडाणा शहराच्या वतीने न.प प्रशासनास निवेदन बुलडाणा शहरातील इकबाल नगर व झोपडपट्टी परिसरातील घाणीचे सावट त्वरित दूर करा या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी बुलडाणा शहराच्या वतीने शहर अध्यक्ष मिलिंद वानखडे यांच्या नेतृत्वात न.प मुख्याधिकारी श्री.गणेश पांडे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, ईकबाल नगर परिसरात अ.मजीद अ.जमीर यांच्या घरापासून ते समीर किराणा यांच्या पर्यंत गल्लीत मोठ्या प्रमाणात सांडपाणी येत आहे. त्यामुळे सदर रस्त्यावरून ये-जा करतांना नागरिकांना घाण सांडपाण्यामुळे परिसरात खुप दुर्गंधवास येत आहे, त्यामुळे परिसरातील नागरीकांच्या व लाहान मुलांच्या आरोग्य धोक्यात येणाचा प्रश्र्न निर्माण झाला आहे.

बुलडाणा शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे आणि यामुळे बुलडाणा शहरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, त्याकरिता न.प प्रशासनाने पावस सुरू होण्याआधी नाली साफसभाई, कचरा-कुळा व सर्व घाणीचे सावट त्वरित दूर करावे या मागणी संदर्भात त्वरित दखल घेत कामे मार्गी लावावे असे निवेदन देण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडी बुलडाणा शहर महासचिव विजय राऊत , दिलीप राजभोज, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष मोहित दामोदर, शहर संघटक अबुल हम्मीद, अब्दुल नावेद, प्रफुल्ल वानखडे, महेंद्र तायडे, अवि भोजने, तन्मय पाटिल व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी घेतली उद्धव ठाकरे यांची भेट

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

माढा लोकसभेचे खासदार नवनिर्वाचित खासदार श्री धैर्यशील मोहिते पाटील यांनी आज शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धवजी ठाकरे साहेब यांची मातोश्री निवासस्थानी भेट घेऊन आभार व्यक्त केले त्यावेळेस उपस्थित संपर्कप्रमुख अनिल कोकीळ जिल्हा प्रमुख संभाजी राजे शिंदे धनंजय तिकडे उपजिल्हाप्रमुख नामदेव नाना वाघमारे तालुकाप्रमुख संतोष राऊत बंडू घोडके सूर्यकांत गाडगे युवा सेनेचे जिल्हा अधिकारी गणेश इंगळे तुषार इंगळे अरविंद पाटील संदीप कदम महादेव बंडगर आधी पदाधिकारी उपस्थित होते



# १७ जूनपासून स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी मालिका 'थोडं तुझं आणि थोडं माझं' उलगडणार नात्यांची गोष्ट

१७ जूनपासून स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी मालिका थोडं तुझं आणि थोडं माझं. कुठलंही नातं टिकवायचं असेल तर फक्त आपल्याच बाजूने विचार करून चालत नाही. नातं परिपूर्ण होण्यासाठी थोडं तुझं आणि थोडं माझं असावं लागतं. स्टार प्रवाहच्या या नव्या मालिकेतूनही अश्याच नात्यांची गोष्ट उलगडेल. स्टार प्रवाहच्या देवयानी मालिकेतून घराघरात पोहोचलेली प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री शिवानी सुर्वे आणि गोठ मालिकेमधून लोकप्रियता मिळालेला सुप्रसिद्ध अभिनेता समीर परांजपे यांची जोडी या मालिकेतून भेटीला येईल. अभिनेत्री मानसी कुलकर्णी देखिल या मालिकेच्या निमित्ताने तब्बल १० वर्षांनंतर मालिका विश्र्वात पदार्पण करणार आहे.

या नव्या मालिकेचं वेगळेपण सांगताना स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'कोणतीही गोष्ट एकट्याने होत नसते. जोडीदाराची थोडी मदत ही लागतेच. थोडं तुझं आणि थोडं माझं ही अशीच गोष्ट आहे. परस्पर नाते संबंध उलगडणाऱ्या गोष्टी सांगण्याचा स्टार प्रवाहचा कायम प्रयत्न असतो. या मालिकेतूनही अशीच एक गोष्ट अधोरेखित होते ती म्हणजे आपल्या अवती भवती जिव्हाळ्याची काळजी करणारी माणसं आहेत. आयुष्य हे जोडून घेतल्यावरच सुंदर असतं. एक प्रेम कथा उलगडताना कौटुंबिक आव्हानं पेलत नायक आणि नायिका हे त्यांचं नातं कसं फुलवत नेतील हे पहायला रसिकांना आवडेल ही खात्री आहे.'



तब्बल ९ वर्षांनंतर पुन्हा एकदा मालिकेत काम करण्यासाठी अभिनेत्री शिवानी सुर्वे फारच उत्सुक आहे. 'स्टार प्रवाह कुटुंबासोबत पुन्हा एकदा जोडली जातेय याचा आनंद आहे. स्टार प्रवाहच्या मालिकांचे विषय, त्याची मांडणी मला खूपच भावते. त्यामुळेच थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेसाठी मी लगेच होकार दिला. मानसी हे पात्र मला अतिशय आवडलं. देवयानी मालिकेला प्रेक्षकांचं भरभरुन प्रेम मिळालं. हेच प्रेम आणि यश माझ्या नव्या मालिकेलाही मिळेल याची खात्री आहे.' अश्या शब्दात शिवानीने आपली भावना व्यक्त केली.

तेजस या व्यक्तिरेखविषयी सांगताना समीर म्हणाला, 'तेजस ही व्यक्तिरेखा खूपच वेगळी आहे. तो खोडकर आहे. त्याला कुणी डिवचलं तर तो आपलं म्हणणं खरं करण्यासाठी वाट्टेल ते करु शकतो. मालिकेचं नाव आणि गोष्ट खूपच भावली मला. प्रत्येक वगोगटाला आपलीशी वाटेल अशी गोष्ट आणि पात्र या मालिकेची जमेची बाजू म्हणता येईल.'अभिनेत्री मानसी कुलकर्णी गायत्री प्रभू हे पात्र साकारणार आहे. १० वर्षांनंतर मालिका विश्र्वात पुनरागमन करताना प्रचंड उत्सुकता असल्याची भावना मानसीने व्यक्त केली. 'गायत्री हे पात्र खूपच हटके आहे. तिची महत्त्वाकांक्षा तिच्या वागण्या-बोलण्यातून जाणवते. आपल्यापेक्षा वरचढ ठरणारं कुणी असू नये यासाठी तिची सतत धडपड सुरु असते.' स्टार प्रवाह प्रस्तुत थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेची निर्मिती अतुल केतकर आणि अपर्णा केतकर यांच्या राईट क्लिक मीडिया सोल्युशन्स या निर्मिती संस्थेने केली आहे. सुप्रसिद्ध दिग्दर्शक चंद्रकांत कणसे या मालिकेच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळत आहेत. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका थोडं तुझं आणि थोडं माझं १७ जूनपासून रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८